I J R S S I S, Vol. VIII, Issue (3), May-2022 : 224-226
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# जागतिकीकरण आणि भारतासमोरील आव्हाने

प्रा. माधव तु. गुरनुले

सहायक प्राध्यापक व राज्यशास्त्र विभागप्रमुख
डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर.
Corresponding Author : madhaogurnule@gmail.com

| Communicated : 05.04.2022 | Revision : 08.04.2022<br>Accepted : 15.04.2022 | Published : 02.05.2022 |
| --- | --- | --- |

**सारांश :**

तत्कालीन प्रधानमंत्री नरसिंहराव आणि अर्थमंत्री डॉ. मनमोहनसिंग यांचे कार्यकाळात भारतात जागतिकीकरणाला १९९१—९२ या दरम्यान सूरूवात झाली. जागतिकीकरणाला भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसने पूर्ण समर्थन दिले. भाजपाने सुध्दा जागतिकीकरणाचे समर्थन केले तसेच डावे पक्ष जागतिकीरणाला विरोध करतांना दिसतात. परंतु त्यांच्या विरोधाला धार नाही.

जागतिकीरणामुळे भारतात खऱ्या अर्थाने भांडवलशाहीला सुरूवात झालेली दिसते. भारतात खाजगीकरणाला चालना मिळाली आणि खाजगीकरणामुळे भारतातील लोकशाहीलाच धोका निर्माण झालेला दिसतो. जागतिकीकरणामुळे राष्ट्र, राज्य ही संकल्पना मोडीत निघालेली दिसते.

जागतिकीकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपण्यांचे वर्चस्व निर्माण झाले. जागतिक व्यापार संघटनेचा हस्तक्षेप होऊ लागला. जागतिकीकरणामुळे मुक्त अर्थव्यवस्थेचे धोरण सुरू झाले. १९९४ मध्ये गॅट करार उरूग्वे येथे झाला.

जागतिकीकरणामुळे शिक्षण, शेती, व्यापार, आरोग्य इत्यादी वेगवेगळया क्षेत्रात श्रीमंत लोकांचा हस्तक्षेप मोठया प्रमाणात सुरू झाला. त्याचा परिणाम म्हणजे भारत सरकारने भारतीय संविधानातील कल्याणकारी धारेणाला तिलांजली देण्याचे धोरण सुरू केले. खाजगीकरणाचे नावावर शेतकरी विरोधी कायदे निर्माण करण्याचे धोरण सुरू झाले. सार्वजनिक उद्योगाचे खाजगीकरण करणे मोठया प्रमाणात सुरू झाले.

शिक्षण महाग झाले. बेरोजगारी मोठया प्रमाणात वाढली शेतकरी आत्महत्या सुरू झाल्या. दारिद्रयात वाढ झाली. अशा प्रकारे जागतिकीकरण्याचे नावावर देशात आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक नवीन गुलामगिरी सुरू झालेली दिसते.

सध्याचे भाजप सरकारने तर रेल्वे, विमान, बॅंका, कोल इंडिया, बि.एस.एन.एल सार्वजनिक उद्योगांचे मोठया प्रमाणात खाजगी लोकांना विकणे सुरू केले आहे. त्यामुळे नागरीक म्हणून देशातील नागरिकांना जे मुलभूत अधिकार हवे आहेत ते सुध्दा धोक्यात आले आहेत.

**बिजसंज्ञा :** जागतिकीकरण, लोकशाही, खाजगीकरण, गुलामगिरी, मुलभूत अधिकार, आव्हान

**जागतिकीकरण म्हणजे काय?**

जागतिकीकरण म्हणजे ‘‘व्यापार, वित्त, रोजगार, तंत्रज्ञान, दळणवळण, विदेशी स्थलांतर, पर्यावरण, राहणी, शासन, समाजव्यवस्था संस्कृती अशा सर्व प्रकारच्या क्षेत्रातून होत असणारे रूपांतर होय. या संज्ञेत १. वित्त व भांडवल हयांची मालकी, २. बाजार व स्पर्धा ३. संशोधन व ज्ञान हयांना संलग्न तंत्रज्ञान ४. नवनव्या वस्तूद्वारा उपयोग व राहणीमानाचे आधुनिकीकरण ५. संपूर्ण जगाविषयी जाणीव ६. राजकीय संलग्नता, जागतिक नियमनाची क्षमता व व्यवस्थापन हया सर्वांचा समावेश होतो. अशा प्रकारे जागतिकीकरण हे आर्थिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रांना व्यापून राहणारे आहे.

आंतरराष्ट्रीय मुद्रा निधीच्या व्याख्येनुसार, ‘जागतिकीकरण म्हणजे वस्तू, सेवा व आंतरराष्ट्रीय भांडवलप्रवाह, अतिजलद व प्रसरण पावणारे तंत्रज्ञान त्यांचे वाढते प्रमाण तसेच विवीधता हयांच्या साहयाने जगातील देशातील सतत वाढत जाणारे परस्परावलंबीत होय.

**जागतिकीकरणाची उद्दिष्टे:—**

१. बर्हिगत क्षेत्रावरील नियंत्रणे शिथिल करणे.
२. विदेशी विनिमयाचा राखीव साठयात वाढ करणे.
३. वित्तीय तूट व देशातील चलन पुरवठयाचा दर कमी करून आर्थिक स्थैर्य स्थापने.
४. उत्पादन गुंतवणूक व किंमती यावरील नियंत्रणे शिथील करणे व बाजार अर्थव्यवस्थेला महत्व देणे तसेच अर्थव्यवस्थेत संसाधने आवंटन करणे.

तत्कालीन प्रधानमंत्री पी.व्ही. नरसिंहराव आणि अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांचे कार्यकाळात भारतात जागतिकीकरणाला १९९१—९२ या दरम्यान सुरुवात झाली. जागतिकीकरणाला भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसने पूर्ण समर्थन दिले. भारतीय जनता पक्षाने सुध्दा जागतिकीकरणाचे समर्थन केले तसेच डावे पक्ष

जागतिकीकरणाला विरोध करतांना दिसतात. परंतु त्याच्या विरोधाला धार नव्हती.

भारताचे १९९१ मधील आर्थिक धोरण हे भारतीय अर्थव्यवस्थेतेतील महत्वाचा टप्पा होय. १९९१ मध्ये भारत सरकारने भारतीय अर्थव्यवस्थेचे शिथिलीकरण व जागतिकीकरण करण्याकरीता आर्थिक सुधारण्याची एक शृंखलाच सुरू केली. त्या आर्थिक सुधारण्यांचा कल हा बाजार अर्थव्यवस्था व देशाच्या जागतिकीकरणाकडे आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचे जागतिक अर्थव्यवस्थेशी एकात्मीकरण व्हावे या उद्देशाने आर्थिक सुधारण्याची ही नीति अवलंबिण्यात आली.

**जागतिकीकरणाकरीता भारताने केलेली उपाययोजना:—**

१. डयूटी फ्री रिप्लेनिशमेंट सर्टिफिकेट स्कीम.
२. डयुटी एनटायटलमेंट पासबुक स्कीम.
३. आयातीचे उदारीकरण.
४. प्रशुल्काचे शिथिलीकरण.
५. भारत ब्रँड समता कोष फंड—११ जुलै १९९६
६. भारतीय व्यापार उन्नती संघटन.
७. कृषी निर्यात विभागाची स्थापना.
८. निर्यात प्रेरणा युनिट.
९. निर्यात प्रक्रियन विभाग.
१०. विशेष आर्थिक विभाग (सेझ)

जागतिकीकरणामुळे भारतात खऱ्या अर्थाने भांडवलशाहीला सुरूवात झालेली दिसते. जागतिकीकरणामुळे भारतात खाजगीकरणाला चालना मिळाली आणि खाजगीकरणामुळे भारतातील लोकशाहीलाच धोका निर्माण झालेला दिसतो. जागतिकीकरणामुळे राष्ट्र आणि राज्य ही संकल्पना मोडीत निघालेली दिसून येते.

**जागतिक व्यापार संघटना:—**

गॅट कराराच्या उरूग्वे फेरीदरम्यान मर्राकेश करारानुसार १ जानेवारी १९९५ ला जागतिक व्यापार संघटनेची स्थापना करण्यात आली. १२ डिसेंबर १९९५ रोजी गॅट करारानुसार होणाऱ्या सर्व चर्चा समाप्त करण्यात आल्या व आंतराष्ट्रीय व्यापार संघटनेचे महत्व अधोरेखित करण्यात आले. संघटनेचे १६४ सभासद देश आहेत.

**उद्दिष्टे:—**

१. बहुपक्षीय व्यापार पध्दतीचा विस्तार करणे.
२. आंतरराष्ट्रीय व्यापार वृध्दिंगत करणे.
३. विकसनशिल देशांना विकासासाठी सहाय्य करणे.
४. अत्यल्प विकास देशांना विकासाची संधी मिळावी यासाठी सकारात्मक उपाय योजना करणे.

जागतिक व्यापार संघटनेमुळे मुक्त व्यापार सुरू झाले. मुक्त अर्थव्यवस्थेचे धोरण सुरू झाले.

जागतिकीकरणामुळे शिक्षण, शेती, व्यापार, आरोग्य इ. वेगवेगळया क्षेत्रात श्रीमंत व भांडवलदार लोकांचा हस्तक्षेप मोठ्या प्रमाणात सुरू झाला. त्याचा परिणाम म्हणजे भारत सरकारने भारतीय संविधानातील कल्याणकारी धोरणाला तिलांजली देण्याचे धोरण सुरू केले. खाजगीकरणाचे नावावर शेतकरी विरोधी कायदे निर्माण करण्याचे धोरण सुरू झाले. सार्वजनिक उद्योगाचे खाजगीकरण मोठया प्रमाणात सुरू झाले.

निकोलस पौलंटाझ यांनी जागतिकीकरण आणि राष्ट्रीय शासन यावर एक ग्रंथ लिहिला पौलांटाझ यांचे सर्वात महत्वाचे निष्कर्ष हे की,—

१. आंतराष्ट्रीय भांडवल कोणत्याही राष्ट्रात जाऊन पोहोचले की त्या राष्ट्रात परिवर्तन घडवून आणणारी ती एक सामाजिक शक्ती ठरते.
२. आंतरराष्ट्रीय भांडवल व स्थानिक भांडवल यांचा परस्परप्रक्रियेतून तेथील राष्ट्रीय भांडवलदार वर्गाचे जे एकत्र हितसंबध असतात ते विरघळू लागतात.
३. मात्र स्थानिक शासनाचे महत्व त्यामधून कमी होत नाही.

जागतिकीकरण्याच्या प्रक्रियेमधून शासनाचे महत्व कमी होत नाही तर त्याच्या मदतीने ती अस्तित्वात येवून चालू राहते आंतराष्ट्रीय भांडवलाच्या येण्याजाण्यावरील निर्बंध काढून टाकने देशातील वित्तीय बाजारपेठामधील भांडवलाचा प्रवाहावरील नियंत्रणे नाहीशी करणे, शासकीय उद्योगाचे मोठया प्रमाणावर खाजगीकरण करणे आणि इतर क्षेत्रावरील नियंत्रणे काढून टाकणे हे सर्व शासनाचे कृतीशिलतेमधून घडून आले आहे.

**जागतिकीकरणाचे परिणाम:—**

**१. शेतकऱ्यावर परिणाम:**

भारतात मागणी व गरजेपेक्षा उत्पादन होऊन देखील कापसाची आयात मोठ्या प्रमाणात केली जात आहे. भारतात १६.४ दशलक्ष गासडया कापसाचे उत्पादन जास्त झाले आहे. याचा अर्थ भारतातील मागणीपेक्षा १ लाख गासडया कापसाचे उत्पादन भारतात जास्त झाले आहे. असे असतांना भारतातील कापसाची आयात प्रचंड प्रमाणात वाढते आहे. त्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होत आहे आणि आत्महत्येचे प्रमाण वाढत आहे.

**२. सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण:**

लोखंड, पोलाद, ॲल्यूमिनियम या धातुची निर्मिती करणारा उद्योग त्यांचे प्रकल्प, तेलाचा शोध घेणे, विज निर्मिती करणे इत्यादी उद्योग सार्वजनिक क्षेत्रातच भारतात सुरू झाले.

बॅका, विमा आणि कोळसा उद्योग रेल्वे, विमानसेवा इत्यादी उद्योग सार्वजनिक क्षेत्रात सुरू झालेत त्यावर सरकारचीच मालकी होती.

परंतु जागतिकीकरणामुळे सर्व उद्योगाचे खाजगीकरण होत आहे. जागतिक बॅक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्या दबावाखाली भारताने सार्वजनिक क्षेत्राचे रूपांतर खाजगी क्षेत्रात करण्यास मान्यता दिली आहे.

**३. विदेशी गुंतवणूकला प्राध्यान्य:**

भारताच्या औद्योगिक विकासाचा पाया असलेले सार्वजनिक उद्योगाचे क्षेत्र मोडीत काढता यावे म्हणून गोबेल्स तंत्राचा वापर करण्यात आला. गॅस ॲथारेटी ऑफ इंडिया, मॉडर्न फुड लिमिटेड, हिंदूस्थान लिव्हर लिमिटेड, भारत ॲल्युमिनियम कंपनी अशा अब्जावधी रूपये किंमतीची मालमत्ता असणाऱ्या कंपनीचे भागभांडवल खाजगी कंपनीला मातीमोल भावाने विकले गेले. केंद्र सरकार, बॅक, रेल्वे, विमानसेवा यांच्या खाजगीकरणाचे धोरण राबवितो आहे.

**४. निर्गुतवणूकीचे धोरण:**

केंद्र सरकार हे त्याने ठरविलेल्या निर्गुंतवणूक धोरणानुसार सार्वजनिक क्षेत्रातील केंद्राची गुंतवणूक मुक्त करण्यास मुखत्यार आहे. असा निर्वाळा खुद सर्वोच्च न्यायालयानेच दिला. त्यामुळे विशिष्ट उद्योग व क्षेत्रात मक्तेदारी निर्माण झाली. संरक्षण, परराष्ट्र व्यवहार, दळणवळण आणि चलननिर्मिती ही चार मुलभूत क्षेत्रे वगळता अन्य सर्व क्षेत्रातील केंद्र सरकारची सार्वजनिक क्षेत्राच्या रूपाने जी गुंतवणूक आहे. ती मुक्त करण्याचे सरकारचे व सत्ताधारी लोकशाही आघाडीचे धोरण आहे असे तत्कालीन केंद्रीय मंत्री प्रमोद महाजन यांनी सांगितले होते.

**५. पर्यावरणावरील परिणाम:**

जागतिकीकरणामधून आपण विकासाचे जे प्रारूप स्वीकारले आहे. त्यामधून पर्यावरणाचा नाश होणे अटळ आहे. शासनाने सामायिक जमिन ताब्यात घेतली की तिचा परिणाम निसर्गातील विविधता नष्ट करण्यात होतो. भारतातील अरण्याचे आता उद्योजकासाठी मळे किंवा मध्यमवर्गासाठी सहलीची स्थाने यात रूपांतर होत आहे. जागतिक बॅकेकडून वनविकास व पर्यावरण विकास म्हणून ज्या योजना अंमलात आणल्या जात आहेत. त्याचा हा परिणाम होय.

**६. वाढती बेकारी:**

गेल्या काही वर्षात लोकशाहीचा जो सर्वत्र ऱ्हास होताना दिसतो त्यांचे कारण कामगारवर्गाचा शक्तीचा ऱ्हास हेच होय. सामाजिक लोकशाहीसाठी चालणाऱ्या चळवळीमध्ये कामगारवर्ग ही एक मोठी शक्ती होती. तिच्या ऱ्हासालाही जागतिकीकरण कारणीभूत आहे.

**भारतासमोरील आव्हाने:**

१. आपल्या सार्वभौमत्वाचे रक्षण कसे करावे हे एक आव्हान आहे.
२. कष्टकरी वर्गाचे शोषण कसे थांबवता येईल.
३. शिक्षण महागडे झाल्यामुळे, शिक्षण कसे द्यावे हे सुध्दा एक आव्हान आहे.
४. बेरोजगारी दूर कशी करावी.
५. शेतीतील साम्राज्यवादाला कसे थांबवावे.
६. सार्वजनिक उद्योगाचे रक्षण करणे.
७. जागतिक नाणेनिधी, जागतिक व्यापार संघटना, गॅट करार यांच्या धोक्यापासून कसे वाचवावे.
८. जागतिकीकरणामुळे पर्यावरणाचे रक्षण करणे.
९. नागरीकांच्या आरोग्याचे रक्षण कसे करावे.

**निष्कर्ष:**

१. जागतिकीकरणामुळे देशाचे सार्वभौमत्व धोक्यात आलेले आहे.
२. जागतिकीकरणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास झालेला आहे.
३. जागतिकीकरणामुळे शेतकरी कर्जबाजारी झालेला आहे.
४. जागतिकीकरणामुळे बेरोजगारी वाढली आहे.
५. जागतिकीकरणामुळे सार्वजनिक उद्योग बंद पडले आहेत.
६. जागतिकीकरणामुळे शिक्षण महाग झाले आहे.
७. जागतिकीकरणामुळे शेती ही कॉरपोरेट झालेली आहे.
जागतिकीकरणामुळे विदेश गुंतवणूक वाढली आहे.

**संदर्भ :**

ॲडमिरल विष्णू भागवत— जागतिकीकरण नवीन गुलामगिरी, समता प्रकाशन, नागपूर, तृतीय आवृत्ती, ऑक्टोबर २००७
नलिनी पंडित— जागतिकीकरण आणि भारत, लोकवाङ्मय गृह, मुंबई, दुसरी आवृत्ती जानेवारी २००४
डॉ. जी.एन. झामरे – भारतीय अर्थव्यवस्था, पिंपळापुरे ॲन्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, प्रथम आवृत्ती जून २०१४